पुढारी

संक्षिप्त

# शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा वेळापत्रकाबाबत आज बैठक

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या विविध अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या शेवटच्या सत्राच्या परीक्षांचे वेळापत्रक व अडचणीबाबत सोमवारी (दि. १८) विद्यापीठ नियुक्त समितीच्या बैठकीत चर्चा होणार आहे. विद्यापीठाच्या वतीने शैक्षणिक सत्र व वेळापत्रक निश्चितीसाठी १८ सदस्यीय समिती नियुक्त केली आहे. समितीकडून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या शिफारसी, राज्य सरकारच्या मार्गदर्शक सूचना आणि विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालये, विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणीबाबत अभ्यास सुरू आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे, समिती अध्यक्ष डॉ. धनाजी कणसे यांच्यासह सदस्यांची सोमवारी सकाळी ११ वाजता ऑनलाईन बैठक होणार आहे. बैठकीत परीक्षेशी संबंधित अडचणी, वेळापत्रकाबाबत चर्चा होणार आहे. समितीकडून अंतिम अहवाल तयार केला जाणार आहे. त्यानंतरच विद्यापीठाकडून परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केले जाणार आहे.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ वसतिगृहात क्वारंटाईन करण्यात आलेल्यांची सुरू असलेली तपासणी. (छाया : पप्पू अत्तार)

### अल्पसंख्याक विद्यार्थिनी वसतिगृह

राजाराम महाविद्यालयाजवळील अल्पसंख्याक विद्यार्थिनी वसतिगृहात सकाळी ११.३० वाजता गेलो. वसतिगृहाचे प्रवेशद्वार बंद होते. या ठिकाणी पोलिसांचा बंदोबस्त होता. वसतिगृहाची क्षमता ९० आहे. ३२ खोल्यांमध्ये ८३ जणांना ठेवण्यात आले आहे. रेड झोनमधील मुंबई, पुणे, सोलापूर, गुजरात येथून प्रवास करून आलेले कागल, हातकणंगले, गगनबावडा, शाहूवाडी, करवीर, उचगाव, मुडशिंगी भागातील नागरिक आहेत. महिला, लहान मुले, पुरुषांचा समावेश आहे. ६० लोकांचे स्वॅब घेतले असून, काहीजणांचे रिपोर्ट अद्याप आलेले नाहीत. क्वारंटाईन नागरिकांना माईकवरून सर्व सूचना देण्यात येत आहेत. सकाळ, दुपारच्या जेवणाबरोबर नागरिकांना आयुर्वेदिक काढा दिला जात आहे. रेड झोनमधील लोकांना व्हरांड्यात बाहेर न फिरण्याच्या सूचना दिल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### राजाराम महाविद्यालय विद्यार्थी वसतिगृह

राजाराम महाविद्यालय विद्यार्थी वसतिगृहात दुपारी १२ च्या सुमारास पोहोचलो. या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कर्मचारी व पोलिस होते. केटरर्सकडून दुपारचे जेवण आल्याने माईकवरून क्वारंटाईन नागरिकांना सूचना देण्यात येत होत्या. वसतिगृहाची क्षमता ५० असून, या ठिकाणी मध्य प्रदेश, मुंबई, पुणे, ठाणे, साताऱ्यातील ४७ जणांना ठेवण्यात आले आहे. यात २० महिला व काही लहान मुले आहेत. क्वारंटाईन केलेल्यांना ताट-वाटी यासह अन्य जीवनावश्यक वस्तू, औषधे, लहान मुलांना दूध, बिस्किटे देण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. बाहेरून वसतिगृहाचे प्रवेशद्वार बंद करण्यात आले होते.

## महिलांची काळजी

वडूज (सातारा) येथील एक गरोदर महिला आठ दिवसांपासून येथील वसतिगृहात राहत आहे. आरोग्य विभागाकडून काळजी घेण्यात येत असून, तपासणीबरोबरच गोळ्या औषधेदेखील देण्यात आली आहेत. रविवारी दुपारी महिलेची तपासणी करण्यात आली. दोन दिवसांत डिस्चार्ज देण्यात येणार असल्याचे त्या महिलेने सांगितले.

### शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभाग वसतिगृह

शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागाच्या विद्यार्थिनी वसतिगृहात दुपारी १ च्या सुमारास गेलो. वसतिगृह प्रवेशद्वाराजवळ प्रशासनाच्या वतीने मंडप घालण्यात आला आहे. येथूनच क्वारंटाईन नागरिकांची माहिती घेतली जात असून, आवश्यक त्या सूचना दिल्या जात आहेत. विद्यार्थिनी वसतिगृहाची क्षमता ४०० असून, ३९३ जणांना क्वारंटाईन करण्यात आले आहे. २० एप्रिलपासून नागरिकांना क्वारंटाईन करण्यात येत आहे. यातील बहुतांशजण रेड झोनमधील मुंबई, पुणे, सोलापूर येथून आलेले आहेत. काहीजणांचे स्वॅब निगेटिव्ह आल्याने त्यांना सोडण्यात आले आहे. दररोज डॉक्टरांच्या पथकाकडून क्वारंटाईन नागरिकांची तपासणी केली जात असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

## शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी वसतिगृहे

विद्यापीठातील विद्यार्थी वसतिगृह क्र. १, २ व ३ या ठिकाणी दुपारी दीडच्या सुमारास पोहोचल्यावर एका क्वारंटाईन तरुणाला चक्कर आल्याने आरोग्य कर्मचाऱ्यांची धावपळ सुरू होती. विद्यापीठात विद्यार्थ्यांची तीन वसतिगृहे असून, क्षमता प्रत्येकी १८० आहे. आजअखेर ६४७ क्वारंटाईन असून, १२२ जणांना डिस्चार्ज देण्यात आला आहे. त्यामुळे ५२५ जण अद्याप वसतिगृहात आहेत. काहीजण कुटुंबासह असल्याने सर्व वसतिगृहे हाऊसफुल्ल झाली आहेत.

**संकलन : संतोष पाटील, सागर यादव, प्रवीण मस्के**

# विद्यापीठ परीक्षा समितीची आज बैठक

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाने पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षांच्या नियोजनासंदर्भात नेमलेल्या परीक्षा व शैक्षणिक वेळापत्रक समितीची सोमवारी (ता. १८) व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे चर्चा होणार आहे.

विद्यापीठाने नेमलेल्या समितीमध्ये १७ सदस्य आहेत. सकाळी अकरा वाजता समिती सदस्यांमध्ये व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे परीक्षेसंदर्भात आढावा घेतला जाईल. विद्यापीठ अनुदान आयोग व राज्य सरकारने नेमलेल्या समितीने परीक्षासंदर्भात यापूर्वीच शिफारशी केल्या आहेत. एक जुलै ते ३१ जुलै या कालावधीत परीक्षा घेण्याविषयी समितीने कळविले आहे. या पार्श्वभूमीवर विद्यापीठ समितीची बैठक होणार आहे.



लोकमत

**लॉकडाऊनचा परिणाम :** नवीन कुलगुरु निवड प्रक्रियेची गती मंदावली; आताच्या कुलगुरुंचा कालावधी जूनपर्यंत

# शिवाजी विद्यापीठात जूनमध्ये प्रभारी कुलगुरु

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोरोनाच्या पार्श्वभूमीवरील लॉकडाऊनमुळे शिवाजी विद्यापीठाच्या नवीन कुलगुरु निवडीच्या प्रक्रियेची गती मंदावली आहे. त्यामुळे कुलगुरुपदाचा कार्यभार जूनच्या तिसऱ्या आठवड्यामध्ये प्रभारींकडे सोपविण्यात येणार आहे.

डॉ. देवानंद शिंदे यांची दि. १८ जून २०१५ रोजी या विद्यापीठाचे बारावे कुलगुरु म्हणून निवड झाली. त्यांचा पाच वर्षांचा कालावधी जूनमध्ये संपणार आहे. त्यापूर्वी नव्या कुलगुरुंच्या निवडीची प्रक्रिया सुरु करण्याचा नियम आहे.

हा नियम आणि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा कलम ११ (३) नुसार समिती कुलपती कार्यालयाकडून निवड समिती स्थापन करण्याची प्रक्रिया गेल्या चार महिन्यांपासून सुरु झाली. त्यातील निवड समितीवर पाठविण्यासाठी विद्यापीठाच्या व्यवस्थापन आणि विद्या परिषदेने संयुक्त बैठक घेऊन दि. २३ जानेवारी रोजी प्रा. अश्विनीकुमार नांगिया यांचे नाव निश्चित केले.

त्याची माहिती कुलपती कार्यालयाला कळविली. त्यानंतर लॉकडाऊनमुळे निवड प्रक्रियेची गती मंदावली आहे. विद्यमान कुलगुरु डॉ. शिंदे यांचे पद रिक्त होण्याच्या संभाव्य दिनांकाच्या एक महिना आधी नव्या कुलगुरुंच्या निवडीची प्रक्रिया पूर्ण करण्याचा संकेत आहे. सध्याची स्थिती पाहता नव्या कुलगुरुंची निवड या मुदतीमध्ये होणार नसल्याचे दिसते. त्यामुळे कुलगुरुपदाचा कार्यभार प्रभारींकडे जाणार आहे. या कुलगुरुंच्या मुदतीबरोबर प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांचीही मुदत संपणार आहे.

## कार्यभार यांच्यापैकी एकाकडे जाण्याची शक्यता

प्र-कुलगुरु, विद्यापीठ कॅम्पसवरील ज्येष्ठतम प्राध्यापक, विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार पहिले असणारे अधिष्ठाता अथवा राज्यातील अन्य विद्यापीठांतील कुलगुरु यांच्यापैकी एका व्यक्तीकडे कुलगुरुपदाचा कार्यभार कुलपती कार्यालयाकडून सोपविण्यात येण्याची शक्यता आहे. कुलगुरुपदाचा कालावधी पाच वर्षांचा असतो. विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार विद्यमान कुलगुरुंना मुदतवाढ देता येत नाही. नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरुंचा कालावधी दि. ७ एप्रिलमध्ये संपला. या पदाचा प्रभारी कार्यभार अमरावतीच्या संत गाडगेबाबा विद्यापीठाच्या कुलगुरुंकडे सोपविण्यात आला आहे.

"व्यवस्थापन आणि विद्या परिषदेने निश्चित केलेल्या प्रा. अश्विनीकुमार नांगिया यांच्या नावाची माहिती फेब्रुवारीमध्ये कुलपती कार्यालयाला कळविण्यात आली आहे. विद्यापीठाच्या पातळीवरील प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

**- डॉ. विलास नांदवडेकर,**
कुलसचिव



## आतापर्यंतचे प्रभारी कुलगुरु

आर. एस. पाटील (ज्येष्ठतमप्राध्यापक), व्ही. के. घाटे, व्ही. एम. चव्हाण (प्र-कुलगुरु), ए. ए. डांगे (बीसीयुडी संचालक), अशोक भोईटे (प्र-कुलगुरु).

# विद्यापीठात ऑनलाईन ताणतणाव व्यवस्थापन कार्यशाळेस प्रतिसाद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातर्फे वाणिज्य व व्यवस्थापनच्या विद्यार्थी, शिक्षकांसाठी एकदिवसीय ऑनलाईन ताणतणाव व्यवस्थापन कार्यशाळा घेण्यात आली. कार्यशाळेसाठी कोल्हापूर, सातारा, सांगली व महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागातून ११२ प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक व विद्यार्थी सहभागी झाले. पहिल्या सत्रामध्ये डॉ. एस. एस. वेरणेकर म्हणाले, काही प्रमाणात ताण असणे गरजेचे आहे; पण अनावश्यक ताण निर्माण झाला तर अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. एमबीए युनिटचे संचालक डॉ. एच. एम. ठकार म्हणाले, आवश्यकतेपेक्षा अधिक ताण निर्माण झाल्यावर व्यक्तीला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. तणावाचे योग्य व्यवस्थापन न झाल्यास त्याचे गंभीर परिणाम स्वतःला, कुटुंबाला, काही वेळा समाजाला भोगावे लागतात. यानंतर डॉ. ए. एम. गुरव म्हणाले, सध्या कोविड- १९ मुळे आपण सर्व लॉकडाऊनमध्ये आहोत. अशा प्रसंगी नेहमीच्या दैनंदिन तणावांपेक्षा वेगवेगळ्या प्रकारचे ताणतणाव सध्या डोके वर काढत आहेत. या ऑनलाईन कार्यशाळेचे समन्वयन ए. एम. गुरव व महेश चव्हाण यांनी केले. केदार मारुलकर यांनी आभार मानले.

पुढारी




कोल्हापूर : १) अंडी ऊबवणूक केंद्रातील अलगीकरण केंद्रात दहा जणांना डिस्चार्ज मिळाला. यावेळी कागदोपत्री सोपस्कार पूर्ण करताना पथक. २) अलगीकरण कक्षात अशा प्रकारे वैद्यकीय पथक आणि कर्मचारी तैनात करण्यात आले. ३) शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी वसतिगृह क्र.१ येथील कार्यालयाजवळ क्वारंटाईन नागरिकांची तपासणी करताना डॉक्टर्स, आरोग्य विभागातील कर्मचारी. ४) बाहेरून आलेले लोक आपल्या कुटुंबांसह पुढे काय? अशा चिंतेत बसलेले दिसत आहेत.

(छाया : तय्यब अली, पप्पू अत्तार)

लोकमत

महत्त्वाचे

# परीक्षा वेळापत्रक समितीची आज बैठक

कोल्हापूर : अंतिम वर्षाच्या लेखी परीक्षेचे वेळापत्रक निश्चितीसाठी शिवाजी विद्यापीठाने नियुक्त केलेल्या समितीची आज, सोमवारी सकाळी ११.30 वाजता ऑनलाईन बैठक होणार आहे. विद्यार्थ्यांच्या मनातील संभ्रम दूर करण्यासाठी परीक्षेच्या नियोजनाबाबतचा प्राथमिक स्वरुपातील माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहे. काही विद्याशाखांतील प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या विषयांचे मूल्यमापन, तर काही विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात थोड्या अडचणी आहेत. त्या दूर करण्यासह लेखी परीक्षेचे वेळापत्रक निश्चित करण्यासाठीची चर्चा या बैठकीत होणार आहे. त्यानंतर सविस्तर अहवाल विद्यापीठ प्रशासनाला सादर केला जाणार असल्याचे समितीचे अध्यक्ष डॉ. डी. जी. कणसे यांनी रविवारी सांगितले.

# SUK set to review exam schedule

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur**: The Shivaji University, Kolhapur, (SUK) has started reviewing its final year examinations scheduled for July. SUK vice-chancellor Devanand Shinde said that the review of exams is underway and around 50,000 final year undergraduate and postgraduate students from Satara, Sangli, and Kolhapur districts will have to appear for the exam if the conditions return to normalcy in the month of July.

He said that they are working on the possibilities of the exams and making sure that the stakeholders get proper information regarding the current happenings regarding the exams.

According to Shinde, the exam schedule they are working on is based mainly on the fact that things will return to somewhat normalcy so that exams could be conducted. In case, the conditions are not suitable, we will have to wait for the state's and University Grants Commission's (UGC) guidelines, Shinde said.

SUK pro-VC D T Shirke told TOI that they have constituted a committee to look after the recommendations given by the state panel.